# परांजपे स्कीम्सच्या 'अथीना बांद्रा' प्रकल्पाची जोरदार विक्री; ९०% हून अधिक घरे विकली

मुंबई दि.२५ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)– परांजपे स्कीम्स कन्स्ट्रक्शन लिमिटेड यांच्या 'अथीना बीकेसी' या निवासी प्रकल्पाला बाजारातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून प्रकल्प आता पूर्णत्वाच्या अंतिम टप्प्यात पोहोचला आहे.

वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स जवळ असलेला हा प्रकल्प बांद्रा परिसरातील वाढत्या निवासी मागणीचे प्रतिबिंब आहे. विकसित होत असलेली पायाभूत सुविधा आणि प्रमुख रोजगार केंद्रांच्या जवळीकतेमुळे हा परिसर महत्त्वाच्या शहरी केंद्रांपैकी एक बनत आहे.

शहरी घरखरेदीदारांच्या बदलत्या अपेक्षांचा विचार करून 'अथीना'ची संकल्पना मांडण्यात आली आहे. या प्रकल्पात उत्तम लोकेशन, सुलभ प्रवास आणि नियोजित बांधकाम प्रगती यांचा समतोल साधण्यात आला आहे. या कॉरिडॉरमधील प्रकल्पांमध्ये अशा घरांची मागणी वाढताना दिसत आहे, जी कमी प्रवास वेळ,बीकेसी ची जवळीक आणि स्पष्ट डिलिव्हरी टाइमलाइनसह विश्वासार्ह बांधकाम प्रगती देतात.

याबाबत बोलताना अमित परांजपे, संचालक बिझनेस डेव्हलपमेंट, परांजपे स्कीम्स कन्स्ट्रक्शन लिमिटेड बीकेसी, म्हणाले,''अल्पावधीतच प्रकल्पातील ९० टक्क्यांहून अधिक इन्व्हेंटरीची विक्री होणे हे बांद्रासारख्या प्रतिष्ठित आणि मागणी असलेल्या निवासी परिसरात प्रीमियम घरांची सातत्यपूर्ण मागणी असल्याचे स्पष्ट दर्शवते. बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स पर्यंत त्वरित पोहोच देणारे आणि वेस्टर्न एक्सप्रेस हाईवे, प्रस्तावित नवीन उच्च न्यायालय संकुल आणि भूमिगत मेट्रो पायाभूत सुविधांद्वारे पश्चिम उपनगर तसेच दक्षिण मुंबईशी सहज जोडलेले प्रकल्प स्वाभाविकपणे घरखरेदीदार आणि गुंतवणूकदारांचे लक्ष वेधून घेतात.

सध्याच्या परिस्थितीत गुंतवणूकदार केवळ स्वतःच्या वापरासाठी घरे निवडत नाहीत, तर त्यांना दीर्घकालीन वाढ आणि स्थैर्य देणाऱ्या मालमत्तेच्या रूपातही पाहत आहेत. बांद्रासारख्या उत्तम कनेक्टिव्हिटी असलेल्या ठिकाणी प्रीमियम रिअल इस्टेट जीवनशैलीचे मूल्य आणि सातत्यपूर्ण भांडवली वाढ यांचा दुहेरी फायदा देते.